# SPANDAN CAREER INSTITUTE
THE WAY OF SUCCESS…

D

प्रश्नपुस्तिका क्र.
BOOKLET No. PS2020

Total Que. : 100
Marks : 200
Time : 120 min


Mob. No. 9923262977
Date :28/12/2019

राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2020
पेपर क्र. (४)
विषय : — राज्यशास्त्र (Political Sciense) [044]

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील**.''

**Head Office : 1st Floor, Vidarbha Hindi Sahitya Sammelan, Jhansi Rani Sq. Sitabuldi, Nagpur-12.**

**Note : Test Series Paper Online available**
**Visit us**

www.spandancareers.org

१. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे.
(१) १९१९ चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्ट हा माँटेग्यु—चेम्सफर्ड अहवालावर आधारित आहे.
(२) १९३५ च्या गव्हर्नमेंट इंडिया अॅक्टनूसार भारतीय विधानमंडळा ऐवजी द्विगृही सभागृहामध्ये रूपांतरीत झाली.
(३) दुहेरी शासन पद्धती १९१९ च्या कायद्याने लागू करण्यात आली.
(४) राज्यघटनेच्या जवळपास ७५ टक्के भाग गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्ट १९३५ चे पुनरनिर्मित रूप आहे म्हटले जावू शकते.

२. राज्यघटनेच्या मसुदयावर 'वकीलांचे नंदनवन' अशी टिका केली जाते त्याची कारणे अशी आहेत. कोणते विधान चुकीचे आहे.
(१) मसुदयाची भाषा केवळ न्यायालयांनाच परिचीत आहे.
(२) मसुदा लोकांना सत्यापासून दूर नेतो असे म्हणतात.
(३) तरतूदीमधील धन्यर्थ केवळ अनुभवी व घटनात्मक कायद्यात पारंगत व्यक्तीलाच समजू शकतो.
(४) मसुदा समीती मधील सातपैकी तीन सभासद त्या काळातील कायदेतज्ञ होते.

३. बरोबर विधान ओळखा.
अ. संविधान सभेच्या सदस्यांनी २६ जानेवारी १९५० ला संविधान वर स्वाक्षऱ्या केल्या.
ब. मूळ संविधानात ३९५ कलमे आणि १२ परिशिष्टये होतो.
(१) अ, ब बरोबर (२) अ बरोबर (३) ब बरोबर (४) अ, ब चूक आहे

४. अ. भारतीय संविधान समीतीची पहिली बैठक ९ ते २३ डिसेंबर १९४६ ला नवी दिल्ली येथे पार पडली.
ब. सरदार हुकूम सिंग, के.टी. शाह, महावीर त्यागी हे घटना समितीतील बिगर काँग्रेस पक्षाचे सदस्य होते.
क. संविधान सभेच्या पहिल्या बैठकीस मुस्लीम लीगचे सर्व सदस्य हजर होते.
वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे.
(१) अ व ब (२) ब व क (३) अ व क (४) अ, ब, क

५. संविधान सभेसंबंधी कोणते विधान बरोबर नाही.
(१) प्रत्येक प्रांताला आणि संस्थानांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा दिल्या जाणार होत्या.
(२) ब्रिटीश प्रातांना दिलेल्या जागा या प्रांतिक विधीमंडळाच्या सदस्याकडून निवडल्या जाणार होत्या.
(३) प्रांतिक विधीमंडळाचे सदस्य मर्यादित मताधिकार असलेल्यांकडून निवडून आले होते.
(४) संस्थानाचे प्रतिनिधी हे अप्रत्यक्षरित्या निवडले जाणार होते.

६. खालीलपैकी कोणत्या भारतीय राज्यघटनेच्या वैशिष्टयावरून असे निदर्शनास येते की, वास्तविक कार्यकारी सत्ता पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या मंत्रिमंडळाच्या हातात आहे.
(१) प्रातिनिधीक लोकशाही (२) अध्यक्षीय लोकशाही
(३) संसदीय लोकशाही (४) प्रत्येक्ष लोकशाही

७. जोडया जुळवा.
अ. डॉ. सच्चिदानंद सिन्हा — १. उद्दीष्टांचा ठराव
ब. डॉ. राजेंद्र प्रसाद — २. घटना परिषदेचे संविधानिक सल्लागार
क. बी.एन. राव — ३. घटना परिषदेचे कायमस्वरूपी अध्यक्ष
ड. प. नेहरू — ४. पहिल्या घटना परिषदेचे तात्पुरते अध्यक्ष

**अ ब क ड**
(१) १ २ ३ ४
(२) १ ४ २ ३
(३) ४ २ १ ३
(४) ४ ३ २ १

८. खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही?
(१) जे.व्ही.पी. समितीने भाषा हा राज्य पुनर्रचनेचा आधार मानव्यास नकार दिला होता.
(२) फाजल अली आयोगाने एक भाषा—एक राज्य हे तत्व नाकारले होते.
(३) फाजल अली अयोगाने १५ घटकराज्य व ६ केंद्रशासीत प्रदेश निर्माण करण्याची शिफारस केली होती.
(४) राज्य पुनर्रचना अधिनियम १९५६ नूसार १४ राज्य व ६ केंद्रशासीत प्रदेश निर्माण करण्यात आले.

www.spandancareers.org

९. जोडया जुळवा.

| **राज्य** | **विशेष तरतुदी** |
|---|---|
| अ. मिझोराम | १. कलम ३७१ |
| ब. अरूणाचल प्रदेश | २. कलम ३७१ G |
| क. महाराष्ट्र | ३. कलम ३७१ I |
| ड. गोवा | ४. कलम ३७१ H |

**अ ब क ड**
(१) २ ४ १ ३
(२) ३ १ ४ २
(३) २ ३ १ ४
(४) ४ १ ३ २

---

१०. भारतात सरकारी आदेशावर मंत्र्यांची सही नसते इंग्लडंमध्ये मात्र:
अ. प्रत्येक सरकारी आदेशावर मंत्र्याची प्रती स्वाक्षरी असते.
ब. राजाला न्यायालयात नेता येत नाही, कारण राजा चूक करू शकत नाही.
वरील कोणते विधान योग्य आहे?
(१) केवळ अ (२) केवळ ब (३) दोन्ही (४) एकही नाही

---

११. खालीलपैकी चुकीची जोडी कोणती?
(१) राज्यपाल नियुक्ती – कलम १५५
(२) अखिल भारतीयसेवा – कलम ३१२
(३) अंदाजपत्रक – कलम ११०
(४) संघ आणि राज्यासाठी लोकसेवा आयोग – कलम ३१५

---

१२. कोणत्या कलमानुसार राज्यपाल राज्याच्या विधानसभेत ॲग्लो इंडियन समुहाच्या प्रतिनिधीची नेमणूक करतो.
(१) कलम ३३३ (२) कलम ३५० (३) कलम ३६० (४) कलम ३५२

---

१३. भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या व चौथ्या भागासाठी राज्य या व्याख्यामध्ये
अ. भारत सरकार आणि संसद
ब. प्रत्येक राज्याचे सरकार आणि विधीमंडळ
क. स्थानिक शासन
ड. भारतीय प्रदेशातील किंवा भारत सरकारच्या नियंमणाखालील इतर शासकीय संस्था यांचा समावेश होतो.
वरीलपैकी कोणते विधान बरोबर आहे.
(१) फक्त अ (२) अ व ब (३) अ, ब, क (४) वरील सर्व

---

१४. खालीलपैकी कोणते विधान भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या परिशिष्टाचे अचूक वर्णन करते.
(१) राज्यघटनेत समाविष्ट भाषांची यादी समाविष्ट आहे.
(२) केंद्र व राज्यामधील अधिकारांचे वाटप यांची यादी
(३) राज्यसभेतील जागांची वाटणी समाविष्ट आहे.
(४) या परिशिष्टात आदिवासी क्षेत्राच्या प्रशासनाबाबत तरतुदीचा समावेश

---

१५. भारतीय संविधानाने नागरिकांना आर्थिक न्यायाची खात्री कशाद्वारे दिली?
(१) उद्देशपत्रिका
(२) मूलभूत अधिकार
(३) मूलभूत कर्तव्ये
(४) राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे

---

१६. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेतील सार्वभौम या संकल्पनेतून खालीलपैकी कोणकोणता अर्थ ध्वनित होतो.
अ. बाहय हस्तक्षेपाविना भारत स्वत:शी निगडीत निर्णय होऊ शकतो व रद्द करू शकतो.
ब. संघ व घटक राज्ये दोन्ही सार्वभौम आहे.
क. भारताचा संघ परकीय भूप्रदेश हस्तगत करू शकतो.
ड. भारताच्या संघाकडे राष्ट्रीय भूप्रदेशात फेरफार करण्याचे अधिकार आहे.
(१) ब, क, ड (२) अ, ब, क (३) अ, क, ड (४) वरील सर्व

---

१७. खालीलपैकी कोणत्या न्यायालयीन निर्णयाद्वारे प्रस्तावना घटनेचा भाग नाही, असे प्रतिपादन करण्यात आले?
(१) केशवानंद भारती खटला (२) गोलखनाथ खटला
(३) बेरूबारी खटला (४) बोम्मई विरूद्ध संघराज्य

१८. मार्गदर्शक तत्वे कोऱ्या चेकप्रमाणे आहेत ज्यांचे वटविणे बँकेच्या इच्छेवर सोडलेले आहे असे कोणी म्हटले आहे?
(१) डॉ. आंबेडकर (२) के.टी. शाह (३) ए.जी.रंगा (४) बी.एन. राव

१९. खालीलपैकी कोणत्या मार्गदर्शक तत्वाचे मूलभूत अधिकारात रूपांतर झाले आहे.
(१) काम करण्याचा अधिकार (२) माहितीचा अधिकार
(३) संपत्तीचा अधिकार (४) शिक्षणाचा अधिकार

२०. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद..... मध्ये अटक व नजरकैदेच्या विरोधातील संरक्षणाच्या तरतुदी दिलेल्या आहेत.
(१) कलम २० (२) कलम २१ (३) कलम २२ (४) वरीलपैकी कोणतेही नाही

२१. भारतीय निर्वाचन आयोगाबाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
(१) केवळ मुख्य निर्वाचन आयुक्तांना आपल्या कार्यकाळाची सुरक्षितता आहे, परंतु इतर निर्वाचन आयुक्तांना तरी सुरक्षितता नाही.
(२) मुख्य निर्वाचन आयुक्तांचे स्थान अथवा दर्जा हा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश समान आहे.
(३) मुख्य निर्वाचन आयुक्त हे केवळ समानातील प्रमुख आहेत.
(४) जर एखाद्या बाबतीत मुख्य निर्वाचन आयुक्त आणि इतर निर्वाचन आयुक्त यांच्यामध्ये मतभेद निर्माण झालो तर त्या बाबीचा निर्णय बहुमताने घेतला जातो.

२२. पुढीलपैकी योग्य विधान ओळखा.
अ. मुलभूत हक्क व्यक्ती सापेक्ष आहेत तर मार्गदर्शक तत्वे समाज सापेक्ष आहे.
ब. राजकीय लोकशाही प्रस्थापित करणे हे मुलभूत हक्कांचे उद्दिष्टये आहे. सामाजिक लोकशाही निर्माण करणे हे मार्गदर्शक तत्वाचे उद्दीष्टये आहे.
क. एका दृष्टीने मुलभूत हक्क नकारात्मक आहे तर मार्गदर्शक तत्वे सकारात्मक आहे.
(१) अ व ब (२) ब व क (३) अ व क (४) अ, ब, क

२३. सरकारी खर्चाने चालणाऱ्या शिक्षण संख्यात धर्मवंशादी कारणास्तव कोणालाही प्रवेश नाकारू शकत नाही अशी तरतूद..... आहे.
(१) स्वातंत्र्याच्या अधिकारात (२) समानतेच्या अधिकारात
(३) धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकारात (४) सांस्कृतिक व शैक्षणिक अधिकारात

२४. पुढीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे.
अ. एखादा कायदा अंमलात येण्या अगोदरच्या त्या कायद्याने प्रतीबंधीत केलेल्या कृत्याकरता कोणीही दोषी ठरविले जाऊ शकत नाही
ब. एकाच अपराधाबद्दल एकापेक्षा अधिक वेळा खटला चालविता येत नाही.
क. कोणीही स्वत:विरूद्ध साक्षीदार होऊ शकत नाही.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) फक्त क (४) वरिल सर्व

२५. प्रसिद्ध मंडल खटल्यामध्ये १९९२ सर्वोच्च न्यायालयाने मागासवर्गीयासंबंधी नोकऱ्यामध्ये आरक्षणाची तरतूद असलेल्या अनुच्छेद १६(४) च्या व्याप्तीचे सर्वकष परिक्षण केले. सर्वोच्च न्यायालयाने या बाबतीत खालीलपैकी कोणते निर्णय दिले?
अ. न्यायालयाने उच्च जातीच्या गरिब घटकासाठी केलेले १० टक्के आरक्षण रद्द केले.
ब. इतर मागासवर्गीयांसाठी केलेले २७ टक्के आरक्षण घटनात्मकदृष्टया काही अटीसह वैध ठरविले.
क. इतर मागासवर्गीयापैकी उन्नत गटात (Creamy Layer) असलेल्या प्रगत घटकांना आरक्षणाच्या लाभातून वगळले जावे
वरीलपैकी कोणते बरोबर आहे.
(१) फक्त अ (२) ब व अ (३) ब व क (४) अ, ब, क

२६. अ. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये हेबीयस कॉर्पस रिट (प्राधिलेख) निर्गमीत करू शकतात.
ब. कारण : सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये दोन्हीना रिट (प्राधिलेख) काढण्याचा समान अधिकार आहे.
(१) दोन्ही बरोबर (२) दोन्ही चूक (३) अ बरोबर ब चूक (४) अ चूक ब बरोबर

२७. मूलभूत कर्तव्याबाबतच्या खालील विधानांचा विचार करा.

अ. म्हटले तर त्यांना काही महत्त्व नसते.

ब. ती ४२ व्या घटनादूरूस्तीने राज्यघटनेत समाविष्ट

क. ही कर्तव्ये राज्यघटनेच्या विभाग IV-A मध्ये व कलम 51A दिली आहे.

ड. अशीच कर्तव्ये अमेरिका व ऑस्ट्रेलियामध्ये आहे.

बरोबर विधान ओळखा

(१) अ आणि ब (२) ब आणि क (३) वरील सर्व (४) अ, ब, क

---

२८. खालील विधाने विचारात घ्या.

अ. भारतातील कोणत्याही राज्याचे विशेष दर्जा असलेले राज्य (Special Category Status State) असे वर्गीकरण करण्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद राज्यघटनेत समाविष्ट नाही.

ब. राष्ट्रीय विकास परिषदेने सर्वप्रथम १९६९ साली जम्मू व काश्मिर, आसाम आणि नागालँड या राज्यांना विशेष दर्जा असलेली राज्य म्हणून मंजूरी दिली होती.

क. केन्द्रीय प्रायोजीत योजनाना आवश्यक असणाऱ्या निधीपैकी ९० टक्के निधी हा विशेष दर्जा असलेल्या राज्याना केंद्रशासनाकडून दिला जातो. तर सामान्य वर्गातील राज्याच्या बाबतीत हाच निधी ६०टक्के असतो.

वरीलपैकी कोणते विधान चुकीचे आहेत?

(१) फक्त अ (२) अ व ब (३) फक्त क (४) वरीलपैकी एकही नाही

---

२९. भारतीय संविधानातील कोणता भाग हा महिलांच्या सन्मानाला न शोभणाऱ्या प्रथांचा त्याग करण्याबाबत सुचवितो?

(१) मुलभूत अधिकार (२) मुलभूत कर्तव्ये (३) प्रस्तावना (४) मार्गदर्शक तत्वे

---

३०. विधान (A) : केशवानंद भारती वि. केरळ राज्य या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असे जाहीर केले की घटनेच्या मूलभूत संरचनेत दुरूस्ती करता येणार नाही.

कराण (R) : सर्वोच्च न्यायालयाने, संसदीय सार्वभौमत्व आणि न्यायालयीन पुनर्विलोकन यामध्ये संतूलन आणले.

(१) (A) आणि (R) बरोबर आहेत (R) हे (A) चे अचूक स्पष्टीकरण

(२) (A) आणि (R) बरोबर आहेत (R) हे (A) चे स्पष्टीकरण नाही.

(३) (A) बरोबर (R) चूक

(४) (R) बरोबर (A) चूक

---

३१. खालीलपैकी कुठल्या बाबी संदर्भात घटनादुरूस्ती करावयाची असल्यास निम्म्यापेक्षा जास्त घटकराज्यांच्या विधिमंडळाची मान्यता आवश्यक ठरते?

अ. राज्यघटनेतील कलम ५४

ब. सातव्या परिशिष्टातील कोणताही विषय

क. संसदेतील राज्याचे प्रतीनिधीत्व

ड. नागरिकत्व प्रदान अथवा रद्द करणे

बरोबर वाक्य ओळखा.

(१) क व ड (२) अ, ब, ड (३) अ, ब, क (४) वरीलपैकी सर्व

---

३२. २४ व्या घटना दुरूस्तीनूसार: योग्य विधान निवडा.

अ. मुलभूत हक्कासह राज्यघटनेतील कोणत्याही भागामध्ये दुरूस्ती करण्याच्या संसदेच्या अधिकाराचा पुनरूच्चार करण्यात आला.

ब. घटनादुरूस्ती विधेयकाला संमती देणे राष्ट्रपतीवर बंधनकारक करण्यात आले.

क. कलम ३१ मधील 'भरपाई' या शब्दाऐवजी रक्कम हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

(१) अ व ब (२) अ व क (३) ब व क (४) फक्त क

---

३३. भारतातील घटनादुरूस्ती प्रक्रियेविषयी अयोग्य विधान ओळखा.

(१) घटनादुरूस्ती विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात सादर करता येते.

(२) घटनादुरूस्ती विधेयकाला राष्ट्रपतीला संमती दयावीच लागते.

(३) घटनादुरूस्ती विधेयक सादर करण्यापूर्वी राष्ट्रपतीची पूर्वसंमती आवश्यक असते.

(४) घटनादुरूस्ती विधेयकासंबंधी संसदेच्या दोन्ही सभागृहात असहमती निर्माण झाल्यास संयुक्त अधिवेशन बोलविण्याची तरतूद नाही.

---

३४. पुढीलपैकी अयोग्य विधान ओळखा.

अ. ५२ व्या घटनादुरूस्तीने मतदानाचे वय २१ वरून १८ वर आणले.

ब. ६१ व्या घटनादुरूस्तीने संसद व राज्य विधान मंडळाच्या संदस्यांच्या दलबदलूपणा बेकायदेशीर ठरविला गेला.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही (४) एकही नाही

---

www.spandancareers.org

३५. विधान (A): राज्यघटना हा देशाचा सर्वोच्च कायदा आहे.
कारण (R): जर घटना दुरूस्तीची प्रक्रिया ताठर असेल
तरच राज्यघटनेने केलेले सत्ता विभाजन आणि राज्यघटनेचे सर्वश्रेष्ठत्व राखले जाईल.
(१) दोन्हीही (A) आणि (R) बरोबर आहेत (R) हे (A) चे स्पष्टीकरण आहे.
(२) दोन्हीही (A) आणि (R) बरोबर आहेत (R) हे (A) चे स्पष्टीकरण नाही.
(३) विधान (A) बरोबर परंतू (R) चूकीचे
(४) विधान (A) चुकीचे परंतू (R) बरोबर

३६. भारतीय राज्यघटनेनूसार खालीलपैकी कोणते विधान अल्पसंख्याकाचे बाबतीत खरे नाही?
अ. राज्यघटनेत फक्त धर्म अथवा भाषा यावर आधारित अल्पसंख्यांक दर्ज्यास मान्यता आहे.
ब. भारतात राहणाऱ्या नागरिकांनाच त्यांची वैशिष्टयपूर्ण लीपी, भाषा व संस्कृती संवर्धनाचा अधिकार आहे.
क. फक्त धार्मिक अल्पसंख्यांकांनाच त्यांच्या शैक्षणिक संस्था स्थापन्याचा अधिकार आहे.
ड. कोणत्याही नागरिकाला राज्य निधीतून मदत प्राप्त होणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत वर्ण, धर्म, जात किंवा भाषेच्या आधारावर प्रवेश नाकारता येणार नाही.
(१) फक्त क (२) फक्त अ (३) अ, क (४) ब, ड

३७. योग्य विधान ओळखा.
अ. भारतात शेषाधिकार केंद्राकडे दिले आहे.
ब. अमेरिकेत शेषाधिकार राज्यांकडे दिले आहे.
क. ऑस्ट्रेलीयात शेषाधिकार केंद्राकडे दिले आहे.
ड. कॅनडात शेषाधिकार राज्याकडे दिले आहे.
(१) अ व ब (२) अ व ड (३) ब व ड (४) अ, ब, क, ड

३८. भारतीय संघ राज्यासंबंधीची खालील विधाने लक्षात घ्या.
अ. अमेरिका, कॅनडा व ऑस्ट्रेलियाच्या घटनांमधून भारतीय राज्यघटनेने संघराज्याची वैशिष्टये घेतली आहे.
ब. घटक राज्यांमधील कराराचे फलीत म्हणजे भारतीय संघराज्य
क. भारतीय संघराज्यातील घटकांना फुटून निघण्याचा अधिकार आहे.
कोणते विधान बरोबर नाही?
(१) फक्त अ (२) ब आणि क (३) अ आणि क (४) फक्त क

३९. कोणत्या घटना दुरूस्तीने राष्ट्रपतीना मंत्री परिषदेच्या सल्ल्यानुसार वागणे बंधनकारक केले.
(१) २४ वी घटनादुरूस्ती (२) ४४ वी घटनादुरूस्ती
(३) ४२ वी घटनादुरूस्ती (४) ५२ वी घटनादुरूस्ती

४०. भारताचे कोणते मुख्य न्यायाधीश होते ज्यांनी काळ प्रभारी राष्ट्रपती पदाची जबाबदारी सांभाळली?
(१) एम.सी. छागला (२) एम. हिदायतुल्ला (३) वाय. चंद्रवुड (४) यापैकी नाही

४१. पुढीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?
(१) उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीतून उद्भवणाऱ्या मुद्दांबाबत सर्वोच्च न्यायालय चौकशी करू शकते.
(२) उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीतून उद्भवणाऱ्या मुद्दयांसदर्भात राष्ट्रपतीचा निर्णय अंतिम असतो.
(३) उपराष्ट्रपतीची निवडणूक अग्राहय ठरविल्यास अशा घोषणे पर्यंत केलेली कर्तव्ये अग्राहय ठरत नाही.
(४) उपराष्ट्रपतीच्या निवडणूकीसंबंधी निर्वाचक गण पूर्ण नसून कारणावरून आव्हान देता येणार नाही.

४२. अयोग्य विधान ओळखा.
अ. आतापावेतो नियमित राष्ट्रपती म्हणून झाकीर हुसेन यांचा कार्यकाल सर्वात कमी राहला.
ब. झाकीर हुसेन व फकरूद्दीन अली अहमद हेच दोघे केवळ त्यांचा राष्ट्रपती म्हणून कार्यकाल पूर्ण करू शकले नाही.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही नाही (४) दोन्हीही

४३. खालीलपैकी चुकीचे विधान ओळखा.
अ. कलम ११२ नूसार राष्ट्रपती वार्षिक वित्तीय विवरणपत्रक संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर मांडण्याची व्यवस्था करतील.
ब. कलम २६५ नुसार कायद्याने प्राधिकृत केल्याखेरिज कोणत्याही कराची आकारणी किवां वसुली करता येणार नाही.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही (४) एकही नाही

www.spandancareers.org

४४. भारताच्या संचित निधीत पुढील खर्चाचा समावेश होत नाही.
(१) लोकसभेचा अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे वेतन व भत्ते
(२) उच्च न्यायालयांच्या न्यायाधिशांचे वेतन व भत्ते
(३) संघ लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष यांचे वेतन व भत्ते
(४) राज्यसभेचा सभापती व उपसभापती यांचे वेतन व भत्ते

४५. लोकलेखा समीतीचे सदस्य खालीलपैकी कोणत्या मतदान पद्धतीने निवडले जातात.
(१) एकल मतदान पद्धतीने (२) एकल संक्रमन मतदान पद्धतीने
(३) त्यांची निवडणूक होत नाही, त्यांची नेमणूक होते (४) वरीलपैकी एकही नाही

४६. भारतीय संविधानाच्या १० व्या परिशिष्टानूसार एखादा सदस्य अयोग्य आहे किवां नाही हे ठरविण्याच्या अधिकार कोणाला आहे.
(१) राज्यसभेचे सभापती (२) लोकसभा अध्यक्ष (३) भारताचे राष्ट्रपती (४) सर्वोच्च न्यायालय
(१) अ, ब, क (२) अ, ब, क, ड (३) अ, ब (४) अ, ब, ड

४७. संसदेकडे खालीलपैकी कोणाला पदावरून काढून टाकण्याचे अधिकार आहे.
अ. महालेखापाल
ब. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश
क. मुख्य निवडणूक आयुक्त
ड. उच्च न्यायालयाचे न्यायाधिश
(१) अ, ब, क, ड (२) अ, ब, ड (३) अ, ब, क (४) अ, क, ड

४८. विधेयके मंजूर करण्यासंबंधात संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये मत भिन्नता असल्यास असा अडथळा दूर करण्यासाठी राज्यघटनेमध्ये कुठल्या विधेयकासाठी संयुक्त बैठक बोलविता येते.
अ. धन विधेयक ब. सर्वसाधारण विधेयके
क. घटनादुरूस्ती विधेयक ड. वित्त विधेयके
(१) अ, ब, क (२) ब, क (३) ब, ड (४) ब, क, ड

४९. योग्य विधान ओळखा
अ. राज्यसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष हे त्या सभागृहाचे सदस्य नसतात.
ब. उपाध्यक्ष जेव्हा सभागृहाचे कामकाज चालवतात तेव्हा ते पहिल्या फेरित मतदान करू शकतात.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) अ व ब योग्य (४) दोन्ही अयोग्य

५०. भारतीय संविधानाच्या खालीलपैकी कोणत्या कलमान्वये निर्वाचन आयोगाची निर्मिती झाली आहे?
(१) कलम ३५२ (२) कलम ३५६ (३) कलम ३२४ (४) कलम ३२६

५१. संविधान सभे बाबत खालीलपैकी कोणती विधाने सत्य आहेत.
अ. ती प्रौढ मताधिकारावर आधरित नव्हती.
ब. ती प्रत्येक्ष निवडलेली संस्था होती
क. ब्रिटीश भारतास २९२ जागा देण्यात आल्या होत्या.
ड. ती विवीध समीत्याद्वारे कार्य करित असे.
(१) अ आणि ब (२) ब आणि क (३) अ आणि ड (४) अ, ब, क, ड

५२. भारत संघराज्य आहे यास खालीलपैकी कोणते तत्व आधार देत नाही.
(१) एक राज्यघटना
(२) द्विगृहि कायदेमंडळ
(३) राज्य घटनेची सवौच्चता
(४) न्यायालयीन पुनर्विलोकन

५३. संविधान सभेतील मूलभूत हक्क आणि अल्पसंख्याक समीतीचे अध्यक्ष कोण होते.
(१) डॉ. आंबेडकर (२) जे. बी. कृपलापी (३) सरदार पटेल (४) पं. नेहरू

www.spandancareers.org

**५४.** कोणत्या समित्यांमध्ये डॉ. आंबेडकर हे सदस्य होते.
अ. मूलभूत अधिकार समीती
ब. अल्पसंख्याक उपसमीती
क. सल्लागार समीती
ड. राज्य समीती
(१) अ, ब, क (२) ब, क, ड (३) अ, ब, ड (४) अ, क, ड

**५५.** भारतीय राज्यघटनेने खालीलपैकी कोणते वैशिष्टये जर्मनीच्या वायमर राज्यघटनेकडून स्विाकरले आहे ?
(१) केंद्रसत्ता प्रबळ असलेल्या संघराज्याची संकल्पना
(२) राष्ट्रपतीच्या निवडणुकीची पद्धत
(३) गणराज्य
(४) राष्ट्रीय आणिबाणीच्या काळात मूलभूत अधिकाराच्या निलंबना संबंधीच्या तरतुदी

**५६.** भारत हे गणराज्य आहे याचा अर्थ
अ. येथे लोकशाही आहे.
ब. राष्ट्रप्रमुख लोकांनी अप्रत्यक्षरित्या निवडून दिलेल्या असतो.
क. येथे संसदीय पद्धती आहे.
ड. पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ लोकांनी निवडून दिलेल्या असतो.
वरील पैकी कोणते विधान बरोबर आहे?
(१) फक्त अ (२) अ व ब (३) फक्त ब (४) क, ड

**५७.** ......... हे भारताचे २५ वे राज्य बनले
(१) मिझोराम (२) गोवा (३) सिक्कीम (४) छत्तीसगड

**५८.** भारतीय राज्यघटनेचा सरनाम्याध्ये खालीलपैकी कशाचा प्रथम उल्लेख करण्यात आला आहे.
(१) स्वातंत्र्य (२) समता (३) बंधूता (४) न्याय

**५९.** राष्ट्रपतीकडून लोकसभेमध्ये ..... ॲग्लो इंडीयन सदस्य नेमले जातात.
(१) ३ (२) १ (३) २ (४) १२

**६०.** लोकसभेचे पहिले उपसभापती कोणत होते ?
(१) जी.बी. मावळणकर
(२) अनंतसयनम अय्यगार
(३) एच.सी. मुखर्जी
(४) टी. के. विश्वनाथन

**६१.** योग्य जोडया जुळवा.

| | |
|---|---|
| अ. कलम ८४ | १. धन विधेयकाची व्याख्या |
| ब. कलम ९३ | २. संसदेची संयुक्त बैठक |
| क. कलम १०८ | ३. लोकसभेची सभापती |
| ड. कलम ११० | ४. संसंद सदस्याची पात्रता |

**अ ब क ड**
(१) १ २ ३ ४
(२) ४ ३ २ १
(३) ३ १ ४ २
(४) २ ४ १ ३

**६२.** भारताच्या संचित निधीतून देयके (Payments) देण्यासाठी ..... द्वारे अधिकृत केले जाते.
(१) वित्त विधेयक
(२) विनोजन विधेयक
(३) वित्तीय अधिनियम
(४) संचित निधी अधिनियम

**६३.** संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकी बाबत कोणते विधान बरोबर आहे ?
अ. ती लोकसभेच्या सभापती द्वारे बोलावली जाते आणि तीचे अध्यक्षस्थान स्विकारले जाते.
ब. ती बोलावली जाते जेव्हा दोन्ही सभागृहामध्ये घटना दुरूस्ती विधेयका बाबत मतभेद असतात.
क. ती बालावली जाते जेव्हा दोन्ही सभागृहामध्ये धनविधेयका बाबत मतभेद असतात.
(१) अ (२) ब (३) क (४) यापैकी एकही नाही

**६४.** खालीलपैकी कोणत्या राज्यांमध्ये विधान परिषद अस्तित्वात नाही.
अ. प. बंगाल ब. गुजरात क. बिहार ड. मध्यप्रदेश इ. कर्नाटक
(१) अ, ब, ड (२) ब, क, ड (३) अ, क, इ (४) ब, ड इ

**६५.** विधानपरिषद निर्माण किंवा संपूष्टात आणण्याचा अधिकार कोणला आहे?
(१) विधान सभा
(२) केंद्र सरकार, विधान सभेच्या २/३ बहूमताने ठराव संमत झाला असल्यास
(३) केंद्र सरकार
(४) वरीलपैकी एकही नाही

**६६.** राज्य मंत्रीमंडळ पद्धतीचे कोणते प्रमुख वैशिष्टय नाही ?
(१) मुख्यमंत्र्याचे नेतृत्व (२) गुप्तता (३) सामुहिक जबाबदारी (४) विधान सभेचे नेतृत्व

**६७.** भारतीय राज्यघटनेतील सातव्या परिशिष्टातील राज्यसुचीमध्ये नमुद केलेला कोणता विषय राष्ट्रीय राजधानी दिल्ली शासनाच्या कार्यक्षेत्रातून विशेषत्वाने वगळण्यात आला ?
अ. सार्वजनिक सुव्यवस्था ब. पोलीस क. जमीन ड. कर
(१) ब (२) अ, ब (३) अ, ब, क (४) अ, ब, क, ड

**६८.** राज्यपाल हा सोन्याच्या पिंजऱ्यातील पक्षी आहे. असे विधान कोणी केले.
(१) विजयालक्ष्मी पंडीत (२) सरोजिनी नायडु
(३) सी. राजगोपालाचारी (४) ए.के. अय्यर

**६९.** सर्वोच्च न्यायालयाच्या खालीलपैकी कोणत्या मुख्य अधिकार कक्षा आहे.
अ. मूळ अधिकारिता
ब. अपिलीय अधिकारिता
क. सल्लागारी अधीकारिता
ड. क्षमादानाची अधिकारिता
(१) अ, क, ड (२) अ, ब, ड (३) ब, क, ड (४) अ, ब, क, ड

**७०.** भारताच्या सर्वोच्च न्यायालयाला अधिकार क्षेत्रातिक्रमण या आधारावर संसदीय कायदा रद्द ठरवता येतो हे वाक्य .... आहे.
(१) बरोबर (२) चूक
(३) अंशता चूक व अंशता बरोबर (४) सांगू शकत नाही

**७१.** खालीलपैकी कोणते सर्वोच्च न्यायालयाच्या प्रारंभीक अधिकार क्षेत्रात समाविष्ट आहे.
अ. भारत सरकार आणि एक किंवा अधिक राज्ये यांच्यातील विवाद
ब. दोन किंवा अधिक राज्यांमधील विवाद
क. संसदेच्या कोणत्याही सभागृहाच्या निवडणुकी संबंधातील विवाद
ड. आंतर राज्य पाणी विवाद
(१) अ, ब (२) अ, ब, क (३) ब, क, ड (४) अ

**७२.** खालीलपैकी कोण सयुक्त लोकसेवा आयोगाची स्थापना करू शकतो.
(१) संघ लोकसेवा आयोग (२) भारतीय संसद (३) भारताचे राष्ट्रपती (४) सर्वोच्च न्यायालय

**७३.** राज्यघटनेच्या कोणत्या घटनादुरूस्तीने संसदेला प्रशासनिक न्यायाधिकरणे स्थापन करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे?
(१) २४ वी घटनादुरूस्ती १९७३
(२) ४२ वी घटना दुरूस्ती १९७६
(३) ४४ वी घटनादुरूस्ती १९७८
(४) ५२ वी घटनादुरूस्ती १९८५

७४. 'कॅबिनेट' हया संज्ञेच्या राज्यघटनेच्या कोणत्या कलमामध्ये उल्लेख केलेला आढळतो?

(१) कलम ७४ (२) कलम ७५ (३) कलम ३५२ (४) कलम १११

---

७५. खालीलपैकी कोणत्या बाबीमध्ये राज्यघटनेत दुरूस्ती करणे किमान निम्म्यापेक्षा कमी नसलेल्या विधानसभेच्या मान्यतेने शक्य होते ?

अ. राष्ट्रपती निवडणूक

ब. घटक राज्यांचे संसदेतील प्रतिनिधीत्व

क. संविधानाच्या ७ व्या परिशिष्टातील सुची

ड. विधान परिषद रद्द करणे

(१) अ,ब,क (२) ब, क, ड (३) अ, ब, क, ड (४) अ, ब, ड

---

७६. भारताचे संविधानातील दुरूस्ती बाबतचा पुढाकार ...... कडून घेतला जातो.

अ. लोकसभा ब. राज्यसभा क. राष्ट्रपती ड. राज्याचे विधीमंडळ

(१) फक्त अ (२) अ व ब (३) अ, ब, ड (४) ब, क

---

७७. योग्य कथन ओळखा

अ. राज्याच्या महाधिवक्त्याची नियुक्ती राज्पाल करतात.

ब. राज्य लोकसेवा आयोगाला अध्यक्षाला राज्यपाल दूर करतात.

क. उच्च न्यायालयाच्या न्यायाधिशांची नियुक्ती राज्यपाल करतात.

(१) अ (२) अ, ब (३) अ, ब, क (४) अ, क

---

७८. योग्य विधान निवडा

अ. अनुच्छेद १६४ (१) नुसार मुख्यमंत्र्याची नेमणूक राज्यपालाकडून केली जाते.

ब. अनुच्छेद १६४ (२) नूसार मत्रिमंडळ विधानसभेत सामुदायिकरित्या जबाबदार असते.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही (४) वरीलपैकी नाही

---

७९. बरोबर विधान ओळखा

अ. राज्यपाल हे राज्यविधीमंडळाचा भाग नाही

ब. राज्यपालांना विधानसभा व विधान परिषदेला संबोधित करण्याचा अधिकार आहे.

क. राज्यपालांना पदमुक्त करण्याच्या अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे.

(१) अ व ब (२) फक्त ब (३) फक्त अ (४) ब व क

---

८०. दोन्ही सभागृहांमधील मतभेद दूर करण्यासाठी भारतात संसदेच्या दोन्ही सभागृहांची संयुक्त बैठक आजपर्यंत .... वेळा घेण्यात आली.

(१) पाच (२) तीन (३) चार (४) दोन

---

८१. खालीलपैकी कोणी लोकसभेचे सभापती पद भूषविले नाही ?

(१) के. एस. हेगडे (२) हुकूम सिंग (३) कृष्णकांत (४) गुरूदयालसिंग धिल्लन

---

८२. भारतीय राज्यघटनेतील कोणत्या कलमानूसार कॅग भारताच्या राष्ट्रपतीस व राज्याच्या राज्यपालास लेखांकन अहवाल सादर करतो.

अ. कलम १५१ ब. कलम १४८ क. कलम १५० ड. कलम १४९

(१) अ आणि ब (२) क आणि ड (३) ब आणि ड (४) फक्त अ

---

८३. पुढील विधानापैकी कोणती बरोबर आहे?

अ. केंद्रातील मंत्रीमंडळ हे सामूहीकरित्या संसदेला जबाबदार असतात.

ब. लोकसभा व राज्यसभा यांचे सदस्य असलेल्या व्यक्ती हया केंद्रीय मंत्रीमंडळामध्ये मंत्री होण्यास पात्र असतात.

(१) फक्त अ (२) फक्त ब (३) दोन्ही (४) कोणतेही नाही

---

८४. भारताच्या उपराष्ट्रपतीची निवड करण्यासाठी निर्वाचक गणामध्ये (इलेक्ट्रोल कॉलेज) समावेश होतो.

(१) संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या निवडून आलेल्या सदस्यांचा

(२) संसदेतील निवडून आलेल्या संदस्यांचा आणि राज्यांच्या विधान सभांमधील निवडून आलेल्या सदस्यांचा

(३) संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या सर्व सदस्यांच्या

(४) संसद आणि राज्यांच्या विधान सभामधील सर्व सदस्यांचा

---

८५. राज्य घटनेनूसार राज्यामध्ये राष्ट्रपती राजवट घोषीत केली जावू शकते.
अ. जेव्हा राज्यशासनाद्वारे मांडलेले विधेयक राज्य विधीमंडळात नामंजूर होते.
ब. जर राज्यघटनेतील तरतुदी प्रमाणे राज्यशासन काम करित नसेल.
क. जर केंद्राने दिलेल्या निर्देशाचे पालन करण्यास राज्यशासन असमर्थ असेल.
ड. जेव्हा राज्याचे राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्यात महत्वाच्या मुद्दयावर मतभिन्नता असेल.
(१) अ, ब, ड (२) ब, क (३) अ, ब, क (४) अ, ब, क, ड

८६. पुढील कोणते विधान चुकीचे आहे.
अ. प्रत्यक्षात उपराष्ट्रपती लोकसभेचाच नामनिर्देशीत असतो.
ब. त्यादृष्टीने राज्यसभेला आपला अध्यक्ष निवडण्याचा अधिकार नाकारला गेला आहे.
(१) अ (२) ब (३) दोन्ही (४) एकही नाही

८७. खालीलपैकी कोणत्या अनुसुचीचा समावेश भारतीय राज्यघटनेत पहिली घटनादुरूस्ती करून करण्यात आला आहे?
(१) ८ वे (२) ९ वे (३) १० वे (४) यापैकी नाही.

८८. विधान A: राज्यघटना हा देशाचा सर्वोच्च कायदा आहे.
कारण R : जर घटना दुरूस्तीची प्रक्रीया ताठर असेल तरच राज्य घटनेने केलेले सत्ता विभाजन आणि राज्यघटनेचे सर्वश्रेष्ठत्व राखले जाईल.
(१) A व R बरोबर R हे A चे स्पष्टीकरण आहे.
(२) A व R बरोबर R हे A चे स्पष्टीकरण नाही.
(३) विधान A बरोबर R चुकीचे
(४) विधान A चुकीचे R बरोबर

८९. एस. आर. बोम्मई विरूद्ध भारत सरकार या खटल्यातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णया संबंधात खालील विधाने विचारात घ्या.
अ. न्यायालयाने सांगीतले की, राष्ट्पतीने संसदेने मान्यता दिल्यानंतरच राज्य विधानसभा विसर्जीत करावी.
ब. जर संसदेने घोषणेला मान्यता दिली नाही तर विधानसभा पुनर्जीवीत करण्यात यावी.
क. राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा समर्थनार्थ योग्य ती सुसंबद्ध कारणे आहेत, ती सिद्ध करण्याची जबाबदारी केंद्राची आहे.
कोणते विधाने बरोबर आहे.
(१) अ (२) अ आणि ब (३) अ आणि क (४) वरील सर्व

९०. भारतीय संविधानातील कोणता भाग हा महिलांच्या सन्मानाला न शोभणाऱ्या प्रयांचा त्याग करण्याबाबत सुचवितो ?
(१) मुलभूत अधिकार (२) मुलभूत कर्तव्ये (३) प्रस्तावणा (४) मागर्दशक तत्वे

९१. जोडया जुळवा

| | |
|---|---|
| अ. नागालँड | १. १९७५ |
| ब. मणिपूर | २. १९८७ |
| क. गोवा | ३. १९७२ |
| ड. सिक्कीम | ४. १९६३ |

**अ ब क ड**
(१) ४ ३ २ १
(२) १ २ ३ ४
(३) ३ ४ १ २
(४) २ १ ४ ३

९२. मार्गदर्शक तत्वांच्या प्रकरणातील कोणते कलम मादक पेयांच्या सेवानावर बंदी घालण्याशी संबंधीत आहे.
(१) कलम ४१ (२) कमल ४८ (३) कलम ४७ (४) कलम ४९

९३. खालीलपैकी कोणते मुलभूत कर्तव्य नाही.
(१) संविधानाचे पालन करणे, संविधानातील आदर्श, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
(२) देशाचे संरक्षण व देशसेवा करण्यास तयार राहणे.
(३) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून जतन करने
(४) मतदान करने.

**९४.** भारताचे कोणते मुख्य न्यायाधीश होते ज्यांनी काही काळ प्रभारी राष्ट्रपती पदाची जबाबदारी सांभाळली ?
(१) एम. सी. छागला (२) एम. हिदायतुल्ला (३) वाय. चंकवूड (४) वरिलपैकी नाही

**९५.** राष्ट्रपतीच्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी मुख्यमंत्री अपात्र ठरतो.
अ. जर तो स्वत: उमेदवार असेल.
ब. जर त्याने बहूमत सिद्ध केले नसेल.
क. जा तो राज्य विधी मंडळाच्या वरिष्ठ गृहाचा सदस्य असेल.
ड. जर तो काळजीवाहू मुख्यमंत्री असेल.
(१) फक्त अ (२) फक्त ब (३) फक्त क (४) फक्त ड

**९६.** राष्ट्रपती खालील कोणत्या परिस्थीतीत आणीबाणी घोषीत करतात ?
अ. बाहय आक्रमण
ब. अंतर्गत कलह
क. राज्यात राज्यकारभार चालविण्यात अपयश
ड. आर्थीक कलह
(१) अ, ब, क (२) अ, क, ड (३) ब, क, ड (४) ब, अ, ड

**९७.** भारतीय राज्यघटनेतील ...... सार्वजनिक स्वरूपात फाशी देण्याविरूद्ध अधिकार प्रदान करते ?
(१) कलम २० (२) कलम २१ (३) कलम २२ (४) कलम ३१

**९८.** खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे.
अ. भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद – १५ हे भारतीय नागरिक आणि परकीय अशा दोघांनाही उपलब्ध आहे.
ब. भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद – १६ हे केवळ भारतीय नागरिकांनाच उपलब्ध आहे.
क. भारतीय राज्यघटनेचे अनुच्छेद – २१ हे भारतीय नागरिक आणि परकियांना देखील भारतीय भूमीवर उपलब्ध आहे.
(१) अ (२) ब, क (३) फक्त क (४) अ, ब, क

**९९.** अनुच्छेद १९ नुसार कोणते अधिकार दिले आहे.
अ. भाषण व अभिव्यक्त स्वातंत्र्य
ब. माहितीचा अधिकार
क. विनाशस्त्र एकत्र येण्याचा अधिकार
ड. संघटना स्थापना करण्याचा अधिकार
(१) अ, ब, क (२) अ, ब, ड (३) अ, क, ड (४) अ, ब, क, ड

**१००.** मुलभूत कर्तव्याचा योग्य क्रम लावा.
अ. राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा सन्मान करणे
ब. सर्वाजनिक संपत्तीचे रक्षण करणे
क. नैसर्गिक पर्यावरणाचे संरक्षण करणे
ड. भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणे
(१) अ, ब, क, ड (२) अ, ड, क, ब (३) अ, ब, ड, क (४) अ, ड, ब, क

**ALL THE BEST**

www.spadancareers.org

SPANDAN Career Institute The way of Success...

# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

Total Que. : 100

राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2020 Marks : 200

Mob. No. 9923262977

विषय : – राज्यशास्त्र (Political Science) [044] Time : 2 hrs

Date : 28/12/2019

ANSWER KEY

## FINAL ANSWER KEY- POLITICAL SCIENCE [044] – [SET D]

| QUE | ANS | QUE | ANS | QUE | ANS | QUE | ANS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 26 | 3 | 51 | 3 | 76 | 2 |
| 2 | 4 | 27 | 4 | 52 | 1 | 77 | 1 |
| 3 | 4 | 28 | 4 | 53 | 3 | 78 | 3 |
| 4 | 1 | 29 | 2 | 54 | 3 | 79 | 1 |
| 5 | 4 | 30 | 1 | 55 | 4 | 80 | 2 |
| 6 | 3 | 31 | 3 | 56 | 3 | 81 | 3 |
| 7 | 4 | 32 | 1 | 57 | 2 | 82 | 4 |
| 8 | 3 | 33 | 3 | 58 | 4 | 83 | 2 |
| 9 | 1 | 34 | 3 | 59 | 3 | 84 | 3 |
| 10 | 3 | 35 | 1 | 60 | 2 | 85 | 2 |
| 11 | 3 | 36 | 1 | 61 | 2 | 86 | 4 |
| 12 | 1 | 37 | 1 | 62 | 2 | 87 | 2 |
| 13 | 4 | 38 | 2 | 63 | 4 | 88 | 1 |
| 14 | 3 | 39 | 1 | 64 | 1 | 89 | 4 |
| 15 | 1 | 40 | 2 | 65 | 2 | 90 | 2 |
| 16 | 3 | 41 | 2 | 66 | 4 | 91 | 1 |
| 17 | 3 | 42 | 3 | 67 | 3 | 92 | 3 |
| 18 | 2 | 43 | 4 | 68 | 2 | 93 | 4 |
| 19 | 4 | 44 | 2 | 69 | 4 | 94 | 2 |
| 20 | 3 | 45 | 2 | 70 | 1 | 95 | 3 |
| 21 | 2 | 46 | 1 | 71 | 1 | 96 | 2 |
| 22 | 4 | 47 | 1 | 72 | 2 | 97 | 2 |
| 23 | 4 | 48 | 3 | 73 | 2 | 98 | 2 |
| 24 | 3 | 49 | 4 | 74 | 3 | 99 | 3 |
| 25 | 4 | 50 | 3 | 75 | 1 | 100 | 2 |

www.spandancareers.org

**“Save Paper, Save Tiger”**